## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये झालेले द्वितीय अपिल

## अपिल क्रमांक : केआर -१७४८/२०१८ मधील संदर्भ तक्रार क्र. ४७४/२०१९

अपिलार्थी, श्री.राजेंद्र रामचंद्र सावंत,
कृष्णकमळ बिल्डींग, ५ वा मजला,
सदनिका क्र.५०३, सर पोचखान वाला रोड,
वरळी पोलीस कॅम्प, मुंबई ४०० ०३०.

विरुध्द

जन माहिती अधिकारी,नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, मालवण, ता.मालवण,
जि.सिंधुदुर्ग ४१६ ६०६.

जन माहिती अधिकारी,तलाठी सजा श्रावण,
ता.मालवण,जि.सिंधुदुर्ग ४१६ ६०६.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १४/०५/२०१९**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०२.०१.२०१८ | ०२.०४.२०१९ | ... | १२.०३.२०१८ |

अपीलार्थीस दि.०२.०१.२०१८ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली "तलाठी मु.पो.श्रावण, ता.मालवण येथील गांव आडवली (घाडीवाडी) येथील गट क्र.१६७८, १९०५, २१५२ माहिती मिळणेबाबत." या विषयाची माहिती न मिळाल्यामुळे आयोगास दि.०९.०५.२०१८ रोजी सादर केलेल्या द्वितीय अपिलावर आज दिनांक १४/०५/२०१९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(महसुल) तहसिल कार्यालय,मालवण व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान विशद केले की, त्यांनी त्यांच्या दिनांक ०२.०१.२०१८ रोजीच्या माहिती अर्जान्वये तलाठी,मु.पो.श्रावण,तालुका मालवण,जिल्हा सिंधुदुर्ग येथील गांव आडवली(घाडीवाडी) येथील गट क्र.१६७८,१९०५,२१५२ बाबत २१ मुद्दयांची माहिती मागितली होती. त्यानुषंगाने विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा श्रावण यांनी मुद्दा क्र.५ व १७ ची माहिती दिली आहे. इतर मुद्दयांची माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(महसुल), तहसिल कार्यालय,मालवण यांनी नमूद केले की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ६(३) अन्वये माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा श्रावण यांचेकडे दि.११.०१.२०१८ रोजी हस्तांतर केला. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा श्रावण यांनी दिनांक ०२.०४.२०१९ रोजी उपलब्ध माहिती अपिलार्थीस दिली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अर्जातील मुद्दा क्र.५ व १७ ची माहिती दिलेली आहे. परंतु,उर्वरित मुद्दयांची माहिती दिलेली नाही. तसेच, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा श्रावण यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती अथवा कोणतेही उत्तर दिलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश देवूनही माहिती दिलेली नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे आवश्यक आहे. परंतु,जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरूद्ध माहिती अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कारवाई का करण्यात येवू नये,याचा खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच, अपिलार्थी अद्याप माहितीपासून वंचित असल्याने,विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणी आयोग पुढीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा श्रावण यांनी हे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थी यांच्या दि.०२.०१.२०१८ रोजीच्या माहिती अर्जाला अनुषंगून कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत डाकेने विनामुल्य पुरवावी.



KOKAN BANCH

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा श्रावण यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ०२.०१.२०१८ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक के.आर.१७४८/२०१८निकाली काढण्यात येत आहे.

**सही/-**
**(के.एल.बिश्नोई)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १४ मे, २०१९.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

तत्कालीन जन माहिती अधिकारी, तलाठी सजा श्रावण, ता.मालवण,जि.सिंधुदुर्ग ४१६ ६०६.

प्रथम अपिलीय प्राधिकारी,मंडळ अधिकारी, श्रावण, ता.मालवण,जि.सिंधुदुर्ग ४१६ ६०६.

**विवेचन**

तक्रारकर्ता श्री.राजेंद्र रामचंद्र सावंत, यांनी द्वितीय अपिल क्रमांक के.आर. १७४८/२०१८ मध्ये आयोगाने दिनांक १४ मे, २०१९ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने, त्यांना अपूर्ण माहिती दिलेली आहे म्हणून आयोगाकडे दि. २७.११.२०१९ रोजी कलम १८ (१) (ङ) खाली तक्रार दाखल केली आहे. या अपिलासंदर्भातील नस्तीवरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. व्ही. एस. कदम तथा तलाठी सजा श्रावण ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग यांनी आयोगाच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना अद्याप परिपूर्ण माहिती दिलेली नसल्याची प्राथमिकरित्या आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. व्ही. एस. कदम तथा तलाठी सजा श्रावण ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २.१.२०१८ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाने दिनांक १४ मे, २०१९ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत पूर्ण माहिती पुरविली नाही म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

सही/-
**(के.एल.बिश्नोई)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ जुलै, २०२१.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना, (२ प्रती) -**

तहसिलदार,
मालवण, ता.मालवण,जि.सिंधुदुर्ग. - यांनी सदर आदेशाची एक प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. व्ही. एस. कदम तथा तलाठी सजा श्रावण ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग यांना द्यावी व त्याची पोच आयोगास सादर करावी.

KOKAN BANCH

**अपिल क्रमांक : केआर -१७४८/२०१८ मधील संदर्भ तक्रार क्र. ४७४/२०१९**

अपिलार्थी, श्री.राजेंद्र रामचंद्र सावंत,

**सुनावणी** दिनांक ४.१२.२०२३ **( In Continuation of order dt.२२.७.२०२१)**

**विवेचन**

उपरोक्त आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम-२० (१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण ३० दिवसांत आयोगास सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तथापि, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.व्ही. एस. कदम, तलाठी, तलाठी सजा श्रावण या अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

**सुनावणीचा तपशील :**

आजरोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित असून त्यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले की, त्यांना मुद्दा क्र. १, ३, ६, ९ ते १६ व मुद्दा क्र. १८ ते २१ ची माहिती अद्याप मिळालेली नाही.

परंतु, या प्रकरणी आयोगाने दि.२२.७.२०२१ रोजी उपरोक्तप्रमाणे आदेश पारित केले असून, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.व्ही. एस. कदम, तलाठी, तलाठी सजा श्रावण यांनी तक्रारकर्ता यांना आयोगाच्या आदेशानंतरही पूर्ण माहिती पुरविली नाही. तसेच सदरची माहिती दिल्याबाबतचा कोणताही समर्थनीय लेखी खुलासा त्यांनी अद्यापपर्यंत आयोगास सादर केलेला नाही. सबब, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशाचा अवमान केला आहे.

सदर वस्तुस्थिती विचारात घेता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आता आयोगाच्या दि.१४.५.२०१९ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र. १ प्रमाणे कार्यवाही करून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगास सादर करणे उचित होईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी सजा श्रावण यांनी आयोगाच्या दि.१४.५.२०१९ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र. १ प्रमाणे कार्यवाही करून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगास तात्काळ सादर करावा.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.व्ही. एस. कदम, तलाठी, तलाठी सजा श्रावण यांनी तक्रारकर्ता यांना आयोगाच्या आदेशानंतरही उपलब्ध माहिती पुरविली नाही. तसेच सदरची माहिती दिल्याबाबतचा कोणताही समर्थनीय लेखी खुलासा त्यांनी अद्यापपर्यंत आयोगास सादर केलेला नाही. सबब, त्यांनी आयोगाच्या आदेशाचा अवमान केला असून त्यांना दि.२२.७.२०२१ च्या आदेशातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये रु. १०,०००/- (अक्षरी रु. दहा हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून २ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र.००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थ संकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करावी. याबाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल तहसिलदार कार्यालय मालवण यांनी आयोगास सादर करावा.

**(भूपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ४ डिसेंबर, २०२३

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई यांचे कार्यालय, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र. ५२७/५२८, कोंकण भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
३. तहसिलदार कार्यालय मालवण, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.

KOKAN BANCH

४. आहरण व संवितरण अधिकारी, तहसिलदार कार्यालय मालवण, ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग ४१६ ६०६.

५. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. व्ही.एस. कदम, तलाठी,
तलाठी सजा श्रावण, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग. **-यांना प्रत**
(विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा श्रावण, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग **यांचेमार्फत रवाना**.)

KOKAN BANCH